# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक २९-०१-२०१० (तहकुब)

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २९/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (दि.२२/१/२०१० ची तहकूब सभा) (का.प.क्र.२२) इतिवृत्त

दि.२९/१/२०१० रोजी मा.सभापती, स्थायी समिती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा (दि.२२/१/२०१० ची तहकूब सभा) महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०३. श्री. सुरे सिताराम इसराम
०४. श्री.गवळी रविकांत काशीनाथ
०५. श्री.घडमोडे भगवान देवीदास
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्री. शिंदे दामोधर
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान
१०. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी :मालमत्ता कर वसुली आणि गुंठेवारी संदर्भांत दोन अधिकाऱ्यांना निलंबीत करण्यात आल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचण्यात आली. आता पर्यंत किती अधिकारी/कर्मचारी निलंबीत केले आहे पुन्हा त्यांना कामावर घेतांना कोणते निर्बंध लावण्यात आले,कोणत्या अटीवर कामावर घेण्यात आले. कामगार अधिकारी श्री.लोखंडे यांना निलंबीत केले आणि पुन्हा कामावर घेतले आणि त्याच जागेवर त्यांना नियुक्त केले. ज्या कारणासाठी निलंबीत केले होते ते उद्देश पुर्ण झाले आहे काय? जे अधिकारी/कर्मचारी निलंबीत झाले त्यांची विभागीय चौकशी झाली आहे का? यासर्व बाबींचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती खान मेहरून्निसा :चार ते आठ दिवसांमध्ये निलंबीत अधिकारी/कर्मचारी यांना कामावर घेण्यात येते.

| | |
|---|---|
| श्रीमती खान मेहरून्निसा | :त्यांच्या नावांवर पीआर कार्ड आहे काय? |
| मा.सभापती | :चार दिवसांमध्ये कुणालाही कामावार घेण्यात आलेले नाही. कुणाला निलंबीत करायचे आणि कामावर घेण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :ज्या कारणासाठी निलंबीत केले होते ते उद्देश पुर्ण झाले आहे काय? प्रशासनाचे समाधान झाले आहे काय? |
| सहायक आयुक्त-१ | :मा.आयुक्त महोदय रूजु झाल्यापासुन आत्तापर्यंत एकुण ३३ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबीत केलेले आहे. त्यापैकी १९ जणांना कामावर परत घेतले आहे. १४ कर्मचारी अद्याप निलंबीत आहे. ०३ लोकांची खाते चौकशी सुरू आहे. एक खाते चौकशी पुर्ण होऊन त्याची शिक्षा प्रस्तावित करून ती संचिका कार्यवाही अंतर्गत आहे. नऊ लोकांना एक हजार रूपये दंड लावुन सेवेत पुन्हा घेतलेले आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबीत केले त्यांना पुन्हा त्याच जागी नियुक्त केलेले आहे का? |
| सहाय्यक आयुक्त-१ | :एसएफडब्ल्यु कर्मचारी श्री.खालेदबिन अहेमद,श्री.गणेश शिंदे,श्री.अवचित मोरे यांनी फॉगींग फवारणीमध्ये दुर्लक्ष केले होते त्याच काळात स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव होता त्यामुळे कामात हलगर्जीपणा केल्यामुळे या कर्मचाऱ्यांना निलंबीत केले होते तपासणीमध्ये तो मायनर चुक असल्यामुळे त्यांना एक हजार रूपये दंड आकारुन निलंबन काळ हा निलंबन काळ ठेवण्यात येवुन सेवेत पुर्नस्थापित करण्यात आले. ते कर्मचारी आरोग्य विभागातील आहे त्यांना त्याच ठिकाणी देण्यात आले. |
| श्री.भगवान घडमोडे | :ज्या वेळेस कर्मचारी/अधिकारी यांना निलंबित केले होते त्यावेळेस प्रशासनाचे अभिनंदन करण्यात आले होते. एकाही सदस्यांनी विरोध केलेला नाही. प्रशासनाने त्यांना पुन्हा कामावर घेतले ज्या कारणासाठी निलंबीत केले होते त्या कारणाचे काय झाले. |
| श्री.रविकांत गवळी | :मा.आयुक्तांच्या कारवाईस विरोध नाही एखादा अधिकारी कर्मचारी काम चुकारपणा करीत असेलतर त्यास शिक्षा झालीच पाहीजे. |
| मा.सभापती | :महानगरपालिकेचा कारभार चांगला चालावा त्यात सुधारणा व्हावी यासाठी मा.आयुक्तांनी निर्णय घेतलेला आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :कामावर घेतांना खातेनिहाय चौकशी अधिन निर्णय घेतले जातात चौकशी झाल्यावर उघडकीस येते की चुक ही छोटी होती ही गोष्ट निलंबनाच्या पुर्वी का नाही बघु शकत. |
| मा.सभापती | :निलंबन हि शिक्षा नाही. |
| श्री.भगवान घडमोडे | :चौकशी करण्याकरीता काही निकष देण्यात आलेले आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :अमरप्रीत हॉटेलच्या प्रकरणामध्ये कुणालाही निलंबित केले नाही. अधिकारी कर्मचारी निलंबनाची माहिती स.सदस्यांना नसते. त्रिवेणी नगर, कुशीनारा हॉउसिंग सोसायटी या प्रकरणांमध्ये काही तरी ठोस निर्णय होतील म्हणुन निलंबनाची कारवाई झाली व नंतर पुन्हा सदरील कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात आले. जागा महानगरपालिकेला भेटली काय पीआर कार्डवर नांव लागले आहे का? |

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | :कुशीनारा सोसायटी व इतर प्रकरणांबाबत स्थायी समितीमध्ये वारंवार चर्चा झाली. वर्तमानपत्रात वारंवार बातम्या आल्या, कुशीनारा सोसायटी येथील चेअरमन श्री.दामु यांचे निधन झाले. त्या कर्मचाऱ्यांचा काहीही संबध नव्हता. |
| श्री.रविकांत गवळी | :नगर रचना विभागातील कर्मचारी आणि कामगार अधिकारी यांना निलंबीत केले होते त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. |
| सहाय्यक आयुक्त-१ | :श्री.वसंत निकम, श्री.शिवाजी लोखंडे आणि श्री.सारंग विधाते यांनी गारखेडा परिसरातील बांधकाम सुरू होते. त्याची रिपोर्टींग वेळेवर केली नाही म्हणुन निलंबीत करण्यात आले होते आणि त्यांचे खुलाशा नंतर कामावर घेण्यात आले. |
| श्री.रविकांत गवळी | :स्थायी समितीला माहिती कळविण्यांत आली नाही. |
| सहाय्यक आयुक्त१ | :अधिकारी यांना निलंबीत केले आणि खाते चौकशी सहा महिण्यांपैक्षा जास्त कालावधीसाठी कर्मचारी निलंबीत असल्यास स्थायी समितीस माहिती कळवायला पाहिजें. |
| श्री.रविकांत गवळी | :सदरील कर्मचाऱ्यांच्या (निलंबीत कर्मचारी) जागी पर्यायी व्यवस्था (कर्मचारी/अधिकारी) नेमल्यास त्याची माहिती देण्यात येत नाही. |
| सहाय्यक आयुक्त-१ | :सर्व स.पदाधिकाऱ्यांना आदेशाची प्रत देण्यात येते. |
| श्री.रविकांत गवळी | :३३ निलंबीत कर्मचाऱ्यांबाबत माहिती देण्यात यावी. |
| सहाय्यक आयुक्त-१ | :१९ कर्मचाऱ्यांना कामावर परत घेतले आहे. १४ कर्मचारी अद्याप निलंबीत आहे. ०३ लोकांची खाते चौकशी सुरू आहे. एक खाते चौकशी पुर्ण होऊन त्याची शिक्षा प्रस्तावित करून ती संचिका कार्यवाही अंतर्गत आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :निलंबनाच्या वळेस पुर्ण चौकशी का करण्यात येत नाही. |
| सहाय्यक आयुक्त-१ | :प्रथम दर्शनी चौकशीवरून निलंबीत करण्यात आले होते. |
| मा.सभापती | :पुर्वी निलंबीत कर्मचाऱ्यांना त्याच जागी कामावर घेण्यात येत नव्हते आता घेण्यात येते. |
| श्री.भगवान घडमोडे | :प्रशासनाने अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित केल्यावर स्थायी समितीने कुठलाही हस्तक्षेप केला नाही. ज्या कारणासाठी निलंबित केले तो उद्देश पुर्ण झाला का? पुर्वीच्याच जागेवर कर्मचारी/अधिकारी यांना कामावर घेण्यात आले. |
| श्री.प्रशांत देसरडा | :कुशीनारा सोसायटीची जागा स्थायी समितीत झालेल्या निर्णयाप्रमाणे अद्यापपर्यंत ताब्यात घेण्यात आलेली नाही. |
| मा.सभापती | :कुशीनारा जमीनीच्या ताब्याबाबत खुलासा करण्यात यावा. |
| सहाय्यक आयुक्त-१ | :जागा ताब्यात घेण्याबाबत माहिती माझ्याकडे नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :भुसंपादन करण्यासाठी अधिकारी नियुक्त केलेले आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :अधिकारी/कर्मचारी ज्या गोष्टींसाठी निलंबीत केल्याजातात त्याबाबतची माहिती होणे गरजेचे आहे. |
| मालमत्ता अधिकारी | :कुशीनारा मागासवर्गीय सोसयटीची जागा आहे सामाईक नांवाचे पीआर कार्ड आहे त्यावर महानगरपालिकेचेही नांव आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :महानगरपालिकेचेही नांव म्हणजे काय? |

मालमत्ता अधिकारी :सर्वे नंबरमध्ये बऱ्याचश्या व्यक्तींचे नांव आहे त्यापैकी महानगरपालिकेचेही नांव आहे.

श्री.रविकांत गवळी :महानगरपालिकेचे जेवढे क्षेत्र आहे त्यावर मालकी हक्काचे महानगरपालिकेचे नांव आहे काय?

श्री.रविकांत गवळी :त्रिवेणी, कुशीनारा व इतर सोसायटीस लिजवर काही वर्षांसाठी देण्यात आलेल्या आहेत माहिती देण्यात यावी. ओपनस्पेस ठेवण्यात आलेले होते ते आहेत का?

श्री.प्रशांत देसरडा :मागील बैठकीत माहिती देण्यात आली होती की, सिटी सर्व्हे ऑफिसला अर्ज पाठविला आहे.

श्री.सतिष कटकटे :त्रिवेणीमध्ये बांधकामास परवानगी दिली आहे का?

मा.सभापती :श्री.खरवडकर यांचे अभिनंदन करण्यात येते की, त्यांनी चांगली कार्यवाही केलेली आहे.

श्री.रविकांत गवळी :या विषयांवर वारंवार चर्चा झालेली आहे प्रशासनाकडुन खुलासा अपेक्षीत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :स्थायी समितीमध्ये जी रूलिंग देण्यात आली तीचे कार्यान्वयन झाले की नाही. भूमि अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठवले होते.

श्री.रविकांत गवळी :तिन वेगवेगळया जातीवर्गामधील अधिकाऱ्यांना निलंबीत केल्यास त्यांचे पाठीराखे नगरसेवकांनी मदत करायची या करीता निलंबन करतो का?

मा.सभापती :ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना चुक केली त्यांना प्रशासनाने निलंबीत केले आहे.

श्री.सतिष कटकटे :कुशीनारा सोसायटीमध्ये मनपाच्या शिक्षीकेचे बांधकाम चालु आहे त्यास परवानगी आहे का?

श्री.रविकांत गवळी :कामावर घेतांना कुठल्या बाबींची पुर्तता करतात खुलासा करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे :निलंबीत केल्यानंतर लगेचच प्रशासन संबधीत अधिकारी कर्मचारी यांना कामावर घेण्यात येते.

मा.सभापती :सदरील विषय प्रशासनाच्या अधिकारातला आहे.

श्री.सतिष कटकटे :ज्या विषयासाठी निलंबीत केले होते त्या विषयाचे काय झाले. महानगर पालिकेचे अधिकारी बांधकामास परवानगी घेत नाही अनाधिकृत बांधकाम केले जाते.

मा.सभापती :कुशीनारा सोसायटीत बांधकामास परवानगी देण्यात आलेली नाही म्हणुन प्रशासनाने खुलासा केलेला आहे. सध्या त्या ठिकाणी बांधकाम चालु नाही. श्री.डी.पी.कुलकर्णी यांनी खुलासा केलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा :संबधीत ठिकाणी खाजगी व्यक्तींनीही अतिक्रमण केलेले आहे.

श्रीमती खान मेहरून्निसा:श्री.अजिज खान गणी खान यांचे बांधकाम तोडण्याचे प्रशासनास आदेश देण्यात आले होते ते तोडण्यात आलेले नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी :निलंबनाच्या कारवाई बाबत चर्चा करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :कामावर घेतांना काही अटी टाकण्यांत आलेल्या आहेत का?

मा.सभापती :संबधीत कर्मचाऱ्यांना एक हजार रूपये दंड आकारण्यात आलेला आहे.

श्री.रविकांत गवळी :दहा दहा लाख रूपये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना एक एक हजार रूपये दंड आकारण्यात आला.

मा.सभापती :कुठल्याही अधिकाऱ्यांना प्रशासनाने क्लिन चिट दिलेली नाही. चौकशी प्रलंबीत आहे. दहा लाखाच्या गैरव्यवहारामध्ये कुणालाही निलंबीत करण्यात आलेले नाही.

श्री.रविकांत गवळी :कामावर घेतांना निलंबन झाल्यानंतरची माहिती स.सदस्यांना होत नाही.

मा.सभापती :प्रशासन माहितीस्तव पदाधिकाऱ्यांना प्रत पाठविण्यात येते.

श्री.प्रशांत देसरडा :निलंबीत केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांबाबत स्थायी समिती सदस्यांनी हस्तक्षेप केलेला नाही.

श्री.रविकांत गवळी :मा.आयुक्तांनी निलंबीत कर्मचाऱ्यांना कामावर घेतांना ज्या बाबीसाठी निलंबीत केले होते त्या बाबींची किमान पुर्तता करून घेणे आवश्यक आहे. पुर्तता झाली असल्यास सभागृहास कळविण्यांत यावे.

मा.सभापती :काम चांगल्या प्रकारे व्हावे प्रशासकीय कामात सुसत्रता रहावी यासाठी मा.आयुक्तांनी वेळोवेळी जे निर्णय घेतलेले आहे ते योग्य आहे. प्रशासनाचे सर्व काम नियमानुसारच चालते.

श्री.रविकांत गवळी :सन १९९० पासून निलंबीत कर्मचाऱ्यांना आज रोजी ७५ टक्के पगार दिला जातो. असे ३८० कर्मचारी आहेत.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

सहायक आयुक्त-१ :जे कर्मचारी ॲन्टी करप्शनच्या प्रकरणांमध्ये निलंबीत झालेले आहे त्याला शासनाच्या गाईड लाईन आहेत ते अंतरिम निलंबन आहे. जेव्हा पर्यंत त्या केसेसचा निर्णय लागत नाही तेव्हा पर्यंत सदरील कर्मचारी/अधिकारी यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यात येत नाही.७५ टक्के पगार द्यावाच लागतो. ११ कर्मचारी ॲन्टी करप्शनच्या प्रकरणामध्ये आहे.

श्री.रविकांत गवळी :आज रोजी निलंबीत असलेले कर्मचारी किती.

सहायक आयुक्त-१ :४१ कर्मचारी आहे. १४ कर्मचारी एक महिण्यांपासून आहेत.

श्रीमती खान मेहरून्निसा :महानगरपालिकेच्या जमीनीवर अतिक्रमण झालेले आहे तत्कालिन आयुक्तांनी बांधकाम तोडण्याचे आदेश दिले होते. सध्या त्या ठिकाणी इमारत अस्तित्वात आहे.

मा.सभापती :प्रशासकीय अधिकारी यांनी इमारत निरीक्षक यांना सोबत घेऊन सदरील जागेची स्थळ पहाणी करून माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :औरंगाबाद शहरात अंतराष्ट्रीयस्तराचे विमानतळ बनविण्यात आलेले आहे. त्यात डिपी रोड तयार करण्यात आलेले आहे डिपी रोड मंजूर आहे. भूसंपादना संदर्भात पैसे विशेष भुसंपादन कार्यालयात भरलेले आहे.

मा.सभापती :प्रशासन अतिक्रमणाची मोहीम चांगल्या रितीने राबवत आहे प्रशासनाचे याबाबतीत अभिनंदन करण्यात येते.

श्री.रविकांत गवळी :डिपी रोड मंजूर झालेला आहे, कार्यवाही चालू आहे आपण मोबदल्याची रक्कम जमा केलेली आहे. सदरील व्यक्तींना नोटीसा गेलेल्या आहेत. चिकलठाणा सर्वे नंबर ७०८,७०९,७१३.

मा.सभापती :भुसंपादनाची रक्कम दिल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :डिपी रोड होणे गरजेचे आहे. अतिक्रमण जे काढलेले आहे तिथे पुन्हा अतिक्रमण होत आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी तेथील अतिक्रमण असेल तर ताबडतोब काढण्यात यावे. नोटीसा पुर्वीच देण्यात आलेल्या आहेत नागरीक न्यायालयात जाण्याची वाट बघत आहे काय? |
| मा.सभापती | :अतिक्रमण काढण्याची किंवा भुसंपादन करण्याची नोटीस देण्यात आलेली आहे काय? |
| श्री.रविकांत गवळी | :नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. गट क्रमांक ७०८,७०९,७१३. |
| मा.सभापती | :गट क्रमांक ७०८,७०९,७१३ नोटीसा देण्यात आलेल्या आहेत काय? |
| उपआयुक्त (सिडको) | :माहीती घेऊन सांगण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | :भुसंपादनासंदर्भात महानगरपालिकेकडुन कार्यवाही चालु आहे नोटीसही देण्यता आलेल्या आहेत. काही ठिकाणी इन्क्रॉचमेंट असेल, बांधकाम परवानगी असेल काय जे असेल त्यामध्ये महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागाकडुन सदरील अनाधिकृत बांधकाम तोडले. |
| मा.सभापती | :त्या प्रकरणी काय हव आहे. भुसंपादनाची कार्यवाही चालु आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :डिपी रोडवर जी बाधीत जागा आहे एखादया व्यक्तीचा प्लॉट असेल ते अनाधिकृत आहे त्यासंदर्भात नोटीस दिलेली आहे. ते अतिक्रमण काढण्यात यावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | :डिपी रोड कुणाचा आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :डिपी रोड महानगरपालिकेचा आहे. |
| मा.सभापती | :भुसंपादनाची रक्कम देण्यात आलेली आहे नोटीस देण्यात आलेली आहे. प्रशासनाने जागा तात्काळ ताब्यात घेण्यात यावी. टिपी सेक्शनची काही मदत लागत असेल तर ती घेण्यात यावी. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :अतिक्रमण झाल्यानंतर अतिक्रमण काढण्यात येते परंतु अतिक्रमण काढल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी अतिक्रमण होते याबाबतची पहाणी केली जात नाही. |
| श्री.सतिष कटकटे | :पैठणगेट येथील कब्रस्थान तोडुन रस्ता रूंदिकरण करण्यात आले मोबदला देण्याचे स्थायी समितीने मान्य केलेले आहे परंतु त्या ठिकणी दोन टपऱ्यांचे अतिक्रमण झालेले आहे ते काढण्यात यावे. |
| मा.सभापती | :पैठणगेट येथील रस्ता रूंदिकरणात मोबदला देण्यात आलेला आहे याबाबतची माहिती प्रशासनाने द्यावी. |
| उप अभियंता (न.र.) | :श्री.राजपूत यांचे प्रकरणात स्थायी समितीने ठराव मंजूर केलेला आहे. धनादेशासाठी लेखा विभागात प्रकरण पाठविण्यांत आले आहे. |
| मुख्यलेखाधिकारी | : श्री.राजपूत यांचे पैठणगेट येथील भुसंपादनाचे प्रकरण आलेले आहे ५० टक्के अदा करण्याचे व्हाउचरचे लेखा विभागात आलेले आहे. त्यांचे म्हणने आहे की, मी वाटाघाटी करून पुर्ण रक्कम मला देण्यात यावी. ५० टक्के रक्कम घेणार नाही मा.आयुक्तांची त्यांनी भेट घेतली प्रशासनाच्या नियमाप्रमाणे ५० टक्के रक्कम रजिष्ट्रीच्या वेळेस आणि ५० टक्के रक्कम पिआर कार्डवर नांव लागल्यानंतर देत असतो. त्यापध्दतीने विभागाने व्हाऊचर पाठविण्यात आले होते प्रशासनाच्या वतीने ५० टक्केचा चेक |

रजिष्ट्रीच्या वेळेस आणि पंधरा ते विस दिवसांनंतरचा पोस्ट डेटेड चेक पिआर कार्डवर नांव लागल्यानंतर देण्यात यावा. अद्यापपर्यंत पेमेंट केलेले नाही.

मा.सभापती :श्री.राजपूत प्रकरणांत ताबा पावती प्रशासनाकडे आहे काय?

उप अभियंता (न.र.) :माहिती घेऊन सांगण्यात येईल.

श्री.प्रशांत देसरडा :नगर पालिकेपासून आज पर्यंत किती भुसंपादन केले याबाबत माहितीची विचारणा केली होती. ज्या प्रॉपर्टी विकत घेण्यात आल्या त्याबाबतची माहिती हवी होती. महानगरपालिकेकडे आज रोजी पर्यंत माहिती तयार नाही. माझे उत्तर अद्याप दिले नाही. मा.आयुक्तांनी एका अभियंत्यास निलंबीत केले. आपण कोट्यावधी रूपये दिलेले आहेत. १४०० प्रापर्टीची माहिती देण्यात आली आहे. त्यापैकी ७०० नांवे वाचता येत नाही. ताबा दिनांक पावतीचा कॉलम विषयी विचारणा केली होती त्या बाबतची माहिती मिळालेली नाही. स्मशानभूमी सापडत नाही. महानगरपालिका हद्दीबाहेर आहे.

श्री.रविकांत गवळी :शहरातील विविध प्रॉपर्टीची माहिती,टॅक्स लावण्याबाबतची माहिती सर्व माहिती महानगरपालिकेकडे आहे. ६ रूपये प्रति चौरस मीटर दर शहरात आकारण्यात येतो. शहरातील हॉटेल कर्मीशिअर दुकाना,मंगल कार्यालय यांचे क्षेत्रफळ याबाबतची माहिती असणे गरजेचे आहे. वर्तमानपत्रात जाहिरात द्या.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये चार मंगल कार्यालय आहेत.

अग्निशमन अधिकारी :चार ते पाच मंगल कार्यालयांनी परवानगी घेण्यात आलेली आहे.

श्री.रविकांत गवळी :मंगल कार्यालयाच्या क्षेत्रफळाबाबत प्रशासनास माहिती असणे आवश्यक आहे. एखाद्या एजन्सी कडुन एनजीओ किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडुन सर्वे करून घेण्यात यावा.

मा.सभापती :एखाद्या एजन्सीकडुन सर्वे करून घेण्यात येईल मा.आयुक्तांसोबत चर्चा झाली आहे.

श्रीमती खान मेहरुन्निसा :शहरात एकुण ४६० मोबाईल टॉवर आहेत १०७ मोबाईल टॉवरचे डिपॉजिट घेण्यात आलेले आहे इतर सर्व मोबाईल टॉवर अवैधरित्या शहरात उभे आहेत.

श्री.भगवान घडमाडे :माझ्या वार्डातील नागरीक श्री.गव्हाणे यांनी जल अदालत मध्ये पाणीपट्टी माफ करण्यासंदर्भांत प्रकरण दाखल केले होते सुनावणी अंती तोंडी सांगण्यात आले की तुमचे एवढया वर्षांची नळपट्टी माफ करण्यात आली. परंतु सन २००८ पासुन डिमांड पुर्वीचीच थकबाकीची येत आहे. लेखी आदेशाबाबत वार्डात अनेक चकरा मारण्यात आल्या. प्रशासनाकडुन सांगण्यात येते की, संचिका सापडत नाही. असे अनेक प्रकरण आहेत की, त्यांना जल अदालतमध्ये माफी मिळाली आहे परंतु प्रश्न अजुनही कायम आहे. प्रकरण निकाली काढुन नागरीक पैसे भरण्यास तयार असतात. प्रशासन ते देत नाही. स्पेकच्या माध्यमातुन चुकीचे टॅक्स लागलेले आहे त्याचाही प्रश्न निकाली निघालेला नाही.

श्री.प्रशांत देसरडा :एखाद्या नागरीकाकडे अवैध नळ कनेक्शन असेल तर अभय योजनेद्वारे ३ ते ४ हजार चार्ज लावुन रेग्युलाईज करून घेतो त्या द्वारे रेग्युलाईज करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे :शहराच्या बाहेर मोहिम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते शहरात मोहिम राबविण्यात आली.

श्री.प्रशांत देसरडा :अवैध नळ कनेक्शन ज्या ठिकाणी सापडेल त्या ठिकाणी जागेवरच तात्काळ नळ कनेक्शन नियमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :अभय योजनेमध्ये मागील जुने रेट कायम ठेवण्याबाबत आदेश दिले होते.

श्री.प्रशांत देसरडा :अभय योजनेबाबत पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :अभय योजनेमध्ये ३२६० रूपये घेण्यात येत होते तत्कालिन आयुक्तांनी ५ हजार रूपये दर लावण्यात आला.

श्री.प्रशांत देसरडा :मोफत नळ कनेक्शन दिले तरी महानगरपालिकेला परवडणारे आहे.

श्री.रविकांत गवळी :मा.आयुक्तांनी जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य केलेली आहे. अवैध नळ कनेक्शन काढल्यानंतर पथक तेथुन गेल्यावर नागरीक पुन्हा नळ कनेक्शन जोडुन घेतात. अभय योजनेमध्ये जो दर लावण्यात आलेला आहे तो दर नागरीकांकडुन वसुल करण्यात यावा. एका एका वसाहतीमध्ये ७० ते ८० अवैध नळ कनेक्शन आहेत ते रेग्युलाईज केल्यास जवळपास ३ लाखापर्यंतचे उत्पन्न महानगरपालिकेला मिळेल.

मा.आयुक्त :महत्वाच्या विषयावर चर्चा सुरू आहे. स.सदस्यांनी आपआपले मुद्दे मांडलेले आहे. बऱ्याच अधिकारी कर्मचारी यांना निलंबीत करण्यात आलेले आहे. आत्तापर्यंत ३३ अधिकारी कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आलेले आहे तीन कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी प्रलंबित आहे. १९ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी होणे बाकी आहे अद्यापही निलंबीत १४ कर्मचारी आहेत. वेगवेगळया कारणासाठी अधिकारी कर्मचारी यांना निलंबीत केलेल आहे. निलंबीत कर्मचाऱ्यांना निलंबनानंतर ५० टक्के पगार देणे, तीन महिण्यानंतर ७५ टक्के पगार देणे अपेक्षीत आहे. निलंबन हि एक शॉर्ट ट्रिटमेंट आहे. निलंबन अनेक कारणांमुळे आवश्यक ठरते एखाद्या कर्मचारी त्याच्या नियुक्त ठिकाणी प्रशासनाच्या शासनाच्या दृष्टीने अडचणीचे ठरते तर अशा प्रकारे शॉर्ट ट्रिटमेंट देणे आवश्यक ठरते. शिस्त हाच एखाद्या संस्थेचा पुढे जाण्याचा पाया आहे. जे शिस्तहिन कर्मचारी आहेत त्यांना अशा प्रकारची ट्रिटमेंट देणे आवश्यक ठरते. जे मुद्दे उपस्थित झालेले आहेत की, निलंबीत कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेता, तर मग त्यांचा दोष नव्हता तर निलंबीत का केले जाते. तक्रारी आल्या, समस्या उद्‌भवली तर प्रशासन तात्काळ संबधीत कर्मचाऱ्यांना निलंबीत केले जाते, निलंबीत केल्यानंतर अनेक केसेस अनेक दिवसांपासून प्रकरणांची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही. निलंबीत कर्मचारी/अधिकारी यांचे संचिकेवर लिहिण्यात येते की, निलंबन करण्यात येत आहे विभागीय चौकशी तात्काळ सुरू करण्यात यावी. अपेक्षा अशी आहे की, निलंबनानंतर लगेचच विभागीय चौकशी सुरू व्हायला पाहिजे. विभागीय चौकशी संपवुन निर्णय घेणे जास्त सोपे होते. एखाद्या ठराविक खात्यातील

कर्मचारी आहे, माहितीगार आहे त्यांना शॉर्ट ट्रिटमेंट दिलेली आहे विभागीय चौकशी प्रलंबीत आहे अशा कर्मचाऱ्यांना ५० ते ७५ टक्के पगार दिला जातो हया भुमिकेतुन पुन्हा कामावर घेतले जाते. ज्या ठिकाणाहुन निलंबीत केले आहे त्याच ठिकाणी कामावर घेणे संयुक्तीक नाही. प्रशासनाने काळजी घ्यावी की ज्या कारणासाठी ज्या ठिकाणाहुन निलंबीत केले आहे त्याच ठिकाणी कामावर पुन्हा घेऊ नये. जागा बदलली गेली पाहिजे. ज्या कारणासाठी निलंबन केले होते ते दिसले पाहिजे. आस्थापना शाखेने ज्या त्रुटी असतील त्या त्रुटी समोर आणाव्यात त्यावर निर्णय घेतल्या जातील. ११ कर्मचाऱ्यांवर ॲन्टी करप्शनच्या केसेस चालु आहे. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन शासनाने निर्णय घेतला की, त्यानुसार विभागीय आयुक्तांकडे सदरील काम सोपविण्यात आले आहे. त्याच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळया कार्यालयाच्या सदस्य मिळुन निर्णय घेतला जातो. प्रशासनाने ११ केसेस तपासुन मा.विभागीय आयुक्तांकडे ठेवाव्यात. दुसरा मुद्दा म्हणजे निलंबन करतांना बॅलन्स राखला जातो का? दुर्देवाने निलंबन झाल्यानंतर अधिकारी कर्मचारी त्या त्या पध्दतीने ॲक्टीव्हेट होतात. निलंबन करण्याचे कारण म्हणजे अकार्यक्षमता,महानगरपालिकेला अडचणीत आणण्याची कृती.

श्री.रविकांत गवळी :परिस्थिती निर्माण केली का झाली याबाबतीत प्रशासन काय निर्णय घेते. कारवाई करण्यासाठी विरोध नाही. निलंबना विषयी गैरसमज होऊ नये म्हणुन विषय चर्चेस आणला आहे.

मा.आयुक्त :पाणीपट्टी आणि मालमत्ता कर वसुली कमी प्रमाणात आहे. १०५ कोटी पैकी वसुलीत ३५ कोटींची वसुली झालेली आहे. वसुली चांगली होण्याच्या दृष्टीने आणि विकास कामे होणे गरजेच्या दृष्टीने प्रशासनाला कडक पावले उचलावी लागतात. ज्या ठिकाणी कारवाई करणे गरजेचे आहे त्या ठिकाणी कारवाई करावी लागते. अतिक्रमणा विषयी पुर्व नियोजित कार्यक्रमाप्रमाणे कृती करणे आवश्यक होते. याबाबतीत प्रत्येक कर्मचाऱ्याने सक्षमपणे उभे राहिले पाहिजे परंतु तसे होत नाही मनपाच्या जागा, धार्मीक स्थळे, हातगाडया, ओपनस्पेस, फुटपाथ ओपन करायचे आहेत. यासाठी मोठया प्रमाणात ताकद लागणार आहे. अवैध नळ कनेक्शन बाबत अभियंत्यांनी निवेदने दिलेली आहे की सदरील कामाबाबत आमच्यावर प्रेशर आहे त्यामुळे सदरील काम काढण्यात यावे पथक निर्माण करण्यात यावे. अवैध नळ कनेक्शनबाबत सर्व माहिती अभियंत्याना आहे. दुरूस्ती करण्याचे काम अभियंत्यांचे,उपअभियंता यांनीच केले पाहिजे. अवैध नळ कनेक्शनमुळे महानगरपालिकेची बदनामी होत आहे वसुली होत नाही. नक्षत्रवाडीपासून तीन टाक्यांपर्यंत जे पाणी येत आहे. त्यावरील जे अवैध नळकनेक्शन आहेत ते काढण्यात यावेत परंतु अधिकारी कर्मचाऱ्यांनी तेथील नळ कनेक्शन न काढता इतर ठिकाणचे नळ कनेक्शन काढण्यात आले. अभय योजनेबाबत तातडीने सुचना प्रसिध्द करून स्थानिक वाहिनीवरून जाहिरात देऊन जनतेपर्यंत माहिती देण्यात यावी. अभय योजनेबाबत आठ

दिवसांची मुदत वाढ देण्यात येईल. तातडीने जागेवरच पैसे भरून नळ कनेक्शन वैध करून घ्यावे.

श्री.रविकांत गवळी :कर्मचाऱ्यांचे म्हणण्यानुसार लेखी आदेश त्यांचेकडे नाही.

मा.आयुक्त :उपअभियंता यांनी लेखी आदेश काढुन संबधीत कर्मचाऱ्यांना आदेशीत करावे.

श्रीमती सफिया मोमीन :आजपर्यंत किती टेंडर स्थायी समितीत आले याबाबत खुलासा करण्यात यावा. वार्ड क्रमांक ९९ मधील पुलाच्या दोन्ही बाजुचे साईडरोडची अवस्था बिकट झालेली आहे. ७५ लाखाचे काम एजन्सी फिक्सींग करीता आलेले नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.एम.डी.सोनवणे) :टेंडर काढलेले आहे ओपन होणे बाकी आहे दोन दिवसांमध्ये ओपन करून स्थायी समितीसमोर आणण्यात येईल.

**विषय क्र. ३११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ बहादुरपूरा बंजारा कॉलनी भागात रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.१४,८२,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा दिनांक १३/११/२००९ विषय क्र.१६५ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा २३.०९% कमी दराने |
| २. | मे.राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा १८.१८% कमी दराने |
| ३. | मे.एम.ए.सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा ११.८७% कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.०९% कमी दराची आहे. मा.आयुक्त यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत शिफारस केली आहे.

तरी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.०९% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :मागील बैठकीत डांबरीकरणाबाबर क्वालिटी राखली जावी म्हणून १५ टक्के रक्कम लेखा विभागात जमा करावी असे आदेश देण्यात आले होते. डांबरीकरणाचे काम शहरात सगळीकडे सुरू आहे. बिलो रेटमध्ये डांबरीकरणाचे काम होत आहे. २३ टक्के बिलो चे काम स्थायी समितीत आले आहे म्हणजे गुत्तेदार ५० टक्के बिलोमध्ये काम करीत आहे. डांबरीकरणाचे जे काही टेंडरचे कामे चालू आहेत याबाबत टेक्निकलीदृष्टया टेक्निकल सेवानिवृत्त अधिकाऱ्यामार्फत चौकशी व्हायला पाहिजे. एका जे.ई कडे २५ ते ३० कामे चालु आहे टेक्निकली तो सर्व ठिकाणी लक्ष देऊ शकत नाही. शहरात जेवढे डांबरीकरण झाले आहे त्याची चौकशी होणे गरजेचे आहे.

श्रीमती मेहरून्निसा खान :डिफर्ड पेमेंट, आयआरडीपीचे सर्व कामे बोगस पध्दतीने करण्यात आलेले आहे या सर्वांची चौकशी झाली पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :२५ ते ३० टक्के बिलो कामे कशामुळे चालली आहे. राजेंद्रसिंग अजितसिंग, कंत्राटदार बऱ्याच ठिकाणी त्यांना कामे मिळालेली आहेत. पुर्वीचेच कामे केलेली आहे किंवा नाही याबाबत चौकशी व्हायला पाहिजे. मुथीयान कॉर्नर ते चौसरनगर या रस्त्याच्या बाबतीत ब्लॅकलिस्ट करण्यात यावे म्हणुन संचिका चालु होती सदरची संचिका गायब झालेली आहे. एम.ए.सिद्दीकी यांनी काम घेऊन बरेच दिवस झालेली आहे वर्कऑर्डर झाली आहे परंतु काम सुरू करण्यात येत नाही.

श्रीमती मेहरुन्निसा खान : डिफर पेमेंट,आयआरडीपीचे कामाबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.(श्री.एम.डी.सोनवणे) :डांबरीकरणाचा आजचा रेट त्यात ॲड केला जातो जेव्हा आज इस्टीमेट तयार केले जाते.

श्री.भगवान घडमोडे : राजेंद्रसिंग अजितसिंग,कंत्राटदार यांचेबाबतीत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.(श्री.एम.डी.सोनवणे) :आयआरडीपीची कामे एक वर्षापुर्वीच संपलेली आहे. डिफरपेमेंटचे कामे सुरू आहे. रोपळेकर हॉस्पीटल ते जवाहर कॉलनी रस्ता तयार करण्याचे काम बाकी आहे. सहा रस्त्यांचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे.

श्रीमती मेहरून्निसा खान :कोणकोणत्या ठिकाणी कामे केली आहेत याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :आजपर्यंत किती अंदाजपत्रकांना मान्यता देण्यात आलेली आहे. एजन्सी फिक्सींगसाठी किती निवीदा झाल्यानंतर आलेल्या आहेत. दहा लाखाचे आतील डांबरीकरणाचे कामे किती झालेली आहे याबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :डांबरीकरणाबाबत गुणवत्तेची पहाणी केली जात नाही.

श्री.रविकांत गवळी :निवडणूका जवळ आलेल्या आहेत डांबरीकरणाचे काम झाले पाहिजे. ज्या निवीदा आलेल्या आहेत त्यानुसार चांगले काम होणे शक्य नाही.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३८ बहादुरपूरा बंजारा कॉलनी भागात रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २३.०९% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३१२ :</u>**

कार्यकारी अभियंता (इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७२ अंतर्गत एन-३, एन-४ भागात विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.१९० दिनांक २४.११.२००९ अनवये रक्कम रू.१४,९९,५००/- च्या अंदरजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झाली असून सदर कामासाठी कार्यालयीन बी-१ निविदा मागविल्या असता एकूण (७) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक ५/१२/२००९ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन | ३१.५१% कमी दराने |
| २. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | ३०.३९% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री.एम.ए.सिद्यीकी | ३०.०१% कमी दराने |
| ४. | श्री.आर.के.कन्स्ट्रक्शन | २९.९९% कमी दराने |
| ५. | श्री.के.बी.पाथ्रीकर | २७.००% कमी दराने |
| ६. | मे.मस्कट कन्स्ट्रक्शन | २६.९% कमी दराने |
| ७. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १.५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३१.५१% कमी दराची मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. ३ वर्षे अनामत रक्कम व सुरक्षा रक्कम परत न करण्याच्या अटीवर मा.आयुक्तांनी दि.२९/१२/२००९ अनवये मंजुरी दिलेली आहे.

सबब तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३१.५१% कमी दराची मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक ३१२ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७२ अंतर्गत एन-३, एन-४ भागात विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३१.५१% कमी दराची मे. राजेश्वर कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.६६ मध्ये हॉटेल सायली ते रविंद्रनगर या १५ मीटर विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९६,५००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.१३२ दि.३१/८/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील सात निविदा दर भरून प्रपप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | ३२.९९% कमी दराने |
| २. | श्री.आर.के.कन्स्ट्रक्शन | ३२.९९% कमी दराने |
| ३. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन | ३१.२१% कमी दराने |
| ४. | श्री.के.बी.पाथ्रीकर | २७.००% कमी दराने |
| ५. | श्री.एम.ए.सिद्यीकी | २५.९६% कमी दराने |
| ६. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २३.१७% कमी दराने |
| ७. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | २१.००% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग व मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे निविदांचे दर सारखेच असून ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% कमी असे आहेत.

तरी श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांचा Performance योग्य नसल्याने मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९९% कमी दराचे निविदापत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तरी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे अं.प.दरापेक्षा ३२.९९% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

मा. सभापती : या कामासाठी दोन एजन्सीचे दर सारखेच आहेत. यापैकी आर.के.कन्स्ट्रक्शन यांनी लेखी पत्र देऊन माघार घेतलेली आहे. त्यामुळे क्रमांक १ चे निविदाधारक श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांचेकडून ३२.९९% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६६ मध्ये हॉटेल सायली ते रविंद्रनगर या १५ मीटर विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी दोन एजन्सीचे दर सारखेच असल्याने व आर.के.कन्स्ट्रक्शन यांनी लेखी पत्र देऊन माघार घेतलेली असल्यामुळे क्रमांक १ चे निविदाधारक श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा ३२.९९% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७३ अंतर्गत पुनःर्डांबरीकरण करण्याचे कामासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.७/११/२००९ ठराव क्र.७०३ अन्वये रक्कम रू.२४,९९,४००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली असून सदर कामासाठी बी-१ निविदा मागविल्या असता एकूण ६ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.२३.११.०९ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.आर.के.कन्स्ट्रक्शन | ३३.१% कमी दराने |
| २. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | ३२.३३% कमी दराने |
| ३. | श्री.एम.ए.सिद्यीकी | २८.९६% कमी दराने |
| ४. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | २७.८८% कमी दराने |
| ५. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २१.९९% कमी दराने |
| ६. | श्री.के.बी.पाथ्रीकर | २१.२१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.१% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास २% अनामत रक्कमे व्यतिरिक्त ५% अतिरिक्त सुरक्षा रक्कम ३ वर्षासाठी घेणेच्या अटीवर मा.आयुक्तांनी दि.२९.१२.०९ अन्वये मंजुरी दिली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.१% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :डांबरीकरणाचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे :यापुर्वी डांबरीकरणाचे प्रस्ताव परत करण्यात आले होते त्या संदर्भात बैठकीत पुन्हा प्रस्ताव आलेले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७३ अंतर्गत पुनःर्डांबरीकरण करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.१% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१५ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७३ अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करण्याचे कामासाठी मा.सर्वसाधारण सभा दि.७/११/२००९ ठराव क्र.७०४ अन्वये रक्कम रू.२४,७५,७४४/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली असून सदर कामासाठी बी-१ निविदा मागविल्या असता एकूण ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.२३.११.०९ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.आर.के.कन्स्ट्रक्शन | ३३.९९% कमी दराने |
| २. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | ३२.३३% कमी दराने |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | २१.७% कमी दराने |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.००% कमी दराने |
| ५. | श्री.एम.ए.सिद्यीकी | १८.८७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास २% अनामत रक्कमे व्यतिरिक्त ५% अतिरिक्त सुरक्षा रक्कम ३ वर्षासाठी घेणेच्या अटीवर मा.आयुक्तांनी दि.२९.१२.०९ अन्वये मंजुरी दिली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७३ अंतर्गत विविध ठिकाणी डांबरीकरण करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६४ अंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर चौक रस्त्यांचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.३१,०४,१३५/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.७/११/०९ विषय क्र.६९४ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ८ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ८ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा ३४.९९% कमी दराने |
| २. | श्री.एम.ए.सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा २८.९६८% कमी दराने |
| ३. | राजेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा २७.८७% कमी दराने |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २७.७७% कमी दराने |
| ५. | अरोरा कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा २४.६६% कमी दराने |
| ६. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा २१.०५% कमी दराने |
| ७. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १७.९९% कमी दराने |
| ८. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ०१.९१% कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.९९% कमी दराची आहे. मा.आयुक्त यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.९९% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६४ अंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर चौक रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.९९% कमी दराची मे.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३१७ :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेले हॉल भाडेपट्ट्याने देणे विनंती अर्ज प्राप्त झाल्यानुसार संबंधीताने मागणी केल्यानुसार भाडेपट्ट्याने हॉल दिल्यास मनपाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

०१. मो.शहासोक्ता कॉलनी येथील खाजगी व्यक्ती श्री.एकबाल अहमद खान आलम शेर खान यांच्या मालकीच्या इमारतीचे क्षेत्रफळ ७५.५० चौ.मी. ची जागा मनपा प्राथमिक शाळा सुरू करणेसाठी शिक्षण विभागातर्फे कळविले असुन सदर व्यक्तीला महानगरपालिकेतर्फे रू.८४/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे रू.६३४२/- प्रतिमाह भाड्याने घेणे योग्य राहील.

०२. सिडको एन-४, हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिका मालकीची बारव (विहिर) बुजविलेली खुली जागा स्थानिक सेवाभावी संस्था परमार्थ महिला सांस्कृतिक मंडळ यांना दि.२.३.२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र.४६१ अनवये झालेल्या ठरावानुसार सिडको एन-४ हनुमान मंदिरासमोरील सिडकोने २००४ मध्ये बुजविलेली बारव परमार्थ सांस्कृतिक मंडळास विनामुल्य देखरेख व संगोपनास जुलै २००६-२०१० पर्यंत देण्यात आली होती. याच सेवाभावी संस्थेस पुढील १० वर्षाकरिता सिडको प्रशासनाच्या अटी व शर्तीवर नियमानुसार विनामुल्य देण्यास व रितसर बांधकाम परवानगी घेवूनच विकास करण्यास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे.

त्याचप्रमाणे दि.१८.१०.२००९ रोजी (का.प.क्र.३१) संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र. ५९६ अन्वये झालेल्या ठरावानुसार संबंधीत सेवाभावी संस्थेस पुढील १० वर्षाकरीता ऐवजी पुढील ६० वर्षाकरिता देणेच्या सुधारीत प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. तसेच दि.२६.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.१२० अनवये परमार्थ सांस्कृतिक महिला मंडळ ही समाजकार्य करणारी संस्थ असल्यामुळे लोकोपयोगी कामासाठी सदरची जागा या मंडळास नाममात्र वार्षिक भाडे रू.१०१/- आकारणी करून देण्यास मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. परंतु ७९२ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.२३/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे भाड्याने देणे योग्य राहील व तसेच अनामत रक्कम मासिक भाड्याच्या १२ पट आकारणे योग्य राहील, असे या समितीचे मत असून कमाल ३० वर्षापर्यंत मुदतीसाठी प्रत्येक १० वर्षानंतर नुतनीकरण व भाडेवाढ करणे योग्य राहील.

०३. सर्व्हे नं.६८ संत तुकोबा नगर एन-२ सिडको येथील महानगरपालिका मालकीचे सभागृह मराठवाडा सार्वजनिक सभेसाठी अभ्यासिका आणि वाचनालयासाठी अध्यक्ष, श्री.पद्माकर मुळे यांना

१०३६.४८ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.१४३/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम आकारणे योग्य राहील.

०४. मो.हर्षनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या व्यापारी संकुलातील हॉल हुमेरा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह.संस्था मर्या. यांना १७९.३५ चौ.मी. क्षेत्रफळासाठी रक्कम रू.८० प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क कर व इतर सर्व कर आकारणे योग्य राहील.

०५. महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकुण क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. असून सदर जागा श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६.०० चौ.मी. जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी विनंती अर्ज केला होता. त्या अनुषंगाने मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सिडको एन-३ येथील उद्यानाजवळील खुल्या जागेचे क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रू.२६/- प्रती चौ.मी. प्रतिमाह प्रमाणे भाडे ठरविले होते व तसेच संबंधीताचे विनंती अर्जानुसार १८६ चौ.मी. क्षेत्र मागणी केल्यानुसार अर्जदारास सदरील जागा रू.२६/- प्रति चौ.मी.प्रतिमाह सा.बां.विभागाने काढून दिल्यानुसार भाडे रू.४८३६/- प्रतिमाह येते. असा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर केला होता. त्यानंतर मा.स्थायी समितीने मा.सर्वसाधारण सभेसमोर शिफारस केलेली होती. मा.सर्वसाधारण सभेने दि.२४/८/२००९ विषय क्र.५९९ अनवये प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकुण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. पैकी श्री.अशोक उजळंबकर यांनी मागणी केल्यानुसार कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र १८६.०० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार ३३ वर्षासाठी महानगरपालिकेच्या संपूर्ण नियमाचे अधिन राहून देण्यास मंजुरी देण्यात येते. असा ठराव पारीत झाला होता. मा.सर्वसाधारण सभेने नाममात्र भाड्याने देणेबाबत चर्चा झाल्यानुसार दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- अनामत रक्कम रू.१२०००/- सेवा शुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषिक कर रू.७.६८ प्रति वर्ष आकारून भाडेपट्ट्याने देणे योग्य राहील. या जागेवरील वास्तु महानगरपालिकेची राहणार असून अर्जदाराने इतरांच्या निधीतून बांधून देणेचे मान्य केले आहे.

०६. मो.बसैय्येनगर (सुराणानगर) येथील महानगरपालिकेचे सभागृह भाडेपट्ट्याने मिळणेबाबत श्री.प्रभात चव्हाण, अध्यक्ष, भारतीय बंजारा उन्नती मंडळ यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे. त्यानुसार संबंधीतास सदरील ठिकाणचे सभागृह भाडेपट्ट्यावर देण्यासाठी मा.आयुक्त यांची मान्यता झालेली आहे. सदरील ठिकाणच्या सभागृहाचे क्षेत्रफळ १६०.०० चौ.मी. असुन सन २००८-०९ सिध्द शिघ्र गणकानुसार रक्कम रू.८६/- प्रती चौ.मी. प्रतिमाह भाड्याने देणे योग्य राहील. तसेच अनामत रक्कम मासिक भाड्याच्या १२ पट आकारणे योग्य राहील. परंतु दिनांक १८.८.२००९ रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.११) मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्र.८७ अनवये झालेल्या ठरावानुसार मो.बसैय्येनगर (सुराणानगर) येथे महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह दि.१६.१.२००७ रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार प्रतिमाह भाडे रू.१०००/- व अनामत रक्कम रू.१२०००/- व सेवाशुल्क रू.५/- प्रति चौ.मी. प्रतिमाह व अकृषीक कर रू.७.८६ प्रति वर्ष आकारून भाडेपट्ट्याने देण्यास मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

करीता वरील प्रमाणे अ.क्र. २, ३, ४, ५ व ६ नुसार जागा भाड्याने देण्यास मान्यता झाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क

रू.५/- प्रती चौ.मी. प्रतिमाह, अकृषी कर रू.७.८६ प्रति चौ.मी. प्रती वर्ष व नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर आकारण्यात येईल तो अर्जदारास इमारत भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करावा लागेल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :भाडेतत्वावर देतांना तेथील राहणारे स्थानिक लोकांना प्राधान्य दिले पाहिजे. |
| उपआयुक्त(सिडको) | :विषय क्रमांक ३१७ मध्ये विविध प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.स्थायी समीतीने आणि सर्वसाधारण समितीने जे रेट मंजूर केले होते तेही तुलनात्मकदृष्टया ठेवलेले आहेत. |
| मा.सभापती | :तत्कालिन आयुक्तांच्या काळात आठ दुकाना शहागंज येथील रेग्युलाईज करण्यासाठी ठेवले होते त्यास अद्यापपर्यंत भाडे लावण्यात आलेले नाही. |
| उपआयुक्त(सिडको | :सदर प्रकरणाची तपासणी करून माहिती घेण्यात येईल. |
| मा.सभापती | :सदरील दुकानांना तात्काळ भाडे लावण्यात यावे. |
| उपआयुक्त(सिडको) | :भाडे समितीची जी शिफारस आहे ती स्थायी समितीच्या निर्देशनास आणुन देणे महत्वाचे आहे. स्थायी समितीने ठरवावे की, भाडे किती लावायचे. भाडे समितीने मजूर केलेले रेट आणि स्थायी समितीने मंजूर केलेले रेट हे दोन्ही बैठकीत समोर ठेवण्यात आलेले आहे मा.स्थायी समितीने निर्णय द्यावा कि, कुठले रेट ठेवण्यात यावे. |
| श्री.रविकांत गवळी | :रेडी रेकनरप्रमाणे भाडे समिती रेट फॉलो करते.मागील बैठकीत मा.आयुक्तांनी निर्देश दिले होते की,आजुबाजूच्या खाजगी मालमत्तांना जे रेट लावण्यात आलेले आहे त्यानुसार भाडे आकारण्यात यावे. |
| उपआयुक्त(सिडको) | :प्रचलित पध्दतीनुसार रेट ठेवण्यात आलेले आहे. |
| मा.सभापती | :विषय क्रमांक ३१७ पुढील बैठकीत सविस्तरपणे ठेवण्यात यावा. |

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील विषय स्थगित ठेवण्यात येतो. पुढील बैठकीत सविस्तरपणे ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३१८ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मल्हार चौक विजयनगर पासून ते तिरूपती विहार पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९९९८५३/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३७१ दिनांक २८.२.२००८ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.उदय इंजिनियरींग वर्क्स | ५.४०% कमी दर |
| २. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | २५.१०% जास्त दर |

वरील प्राप्त निविदापत्रकांपैकी मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.४०% कमी असे आहेत.

तरी मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.४०% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :विषय क्रमाक ३१८ बाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :विषय क्रमांक ३१८ पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३८ मो.गांधीनगर, बहादुरपूरा, बापुनगर भागात १५० मी.मी. व्यासाची डीआयके जलवाहिनी टाकणेच्या कामाचे फेरनिविदा ई-निविदा विभागामार्फत केली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस निविदा दर भरून एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | उदय इंजिनियरींग वर्क्स | अं.प.दरापेक्षा ७.८६% कमी दराने |
| २. | एल. के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ७.७८६% कमी दराने |
| ३. | सुरेश बी. सादवाणी | अं.प.दरापेक्षा ४.१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा उदय इंजिनियरींग वर्क्स यांची आहे. उक्त निविदा दरास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याची शिफारस करण्यात येते.

करीता मे.उदय इंजिनियरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.एम.डी.सोनवणे) :प्रभाग क्रमांक ३८ गांधीनगर बहादुरपूरा,बापूनगर १५० मि.मि व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम आहे. प्रस्तावात चुकून अंदाजपत्रकाची रक्कम लिहिण्याची राहिलेली आहे.

मा.सभापती :विषय क्रमांक ३१९,३२०,३२१ पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जवाहर कॉलनी शाळेच्या स्लॅब दुरूस्त करणे व इतर किरकोळ कामे करण्याकरीता रक्कम रू.७,७१,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली असून त्यामधुन ७,३३,७२४/- इतक्या रक्कमेचे काम श्री.महेश राजपूत, कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले आहे.

सदर वॉर्डाच्या स.नगरसेविका यांनी या शाळेत खोल्यामधील फरशी काढून नविन बसविणे तसेच इतर किरकोळ दुरूस्ती करण्याची मागणी केली आहे व या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४६० दि.२.३.२००९ अन्वये रक्कम रू.५.०० लक्ष ची तरतुद उपलब्ध करून दिली आहे.

तरी वरीलप्रमाणे वाढीव काम करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रू.४,९९,९५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. मूळ अंदाजपत्रक रक्कम रू.७,३३,७२४/- व वाढीव कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,९९,९५९/- असे एकुण रू.१२,७०,९५९/- चे अंदाजपत्रक होत आहे.

तरी वाढीव कामाकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकासह रक्कम रू.१२,७०,९५९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा तसेच सदरील काम याच कामाचे कंत्राटदार श्री.महेश राजपुत यांच्याकडून मंजूर दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचे मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला जालना रोड क्रांतीचौक येथील उड्डाण पुलाच्या कामात बाधीत होणारी जलवाहिनी स्थलांतरीत करणे बाबत कामाची ई-निविदा विभागा मार्फत निविदा प्रसिध्द केली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकुण ०२ निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.व्ही.एस.देशमुख | ४.९९% जास्त दराने |
| २. | मे. उदय इंजिनियरींग वर्क्स | १९.८९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा श्री.व्ही.एस.देशमुख यांची आहे. उक्त निविदा दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री.व्ही.एस.देशमुख यांची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)

## सुचना

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३(१) व त्यास अनुसरून अनुसूची-ड, प्रकरण २ चे नियम क्र. ३ आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६६(१) अन्वये.)

**दिनांक :- १५/०१/२०१०**

**सु च ना**

**दिनांक १५ जानेवारी २०१० शुक्रवार रोजी दुपारी ४.०० वाजता** आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात येत आहे. सभेची पुढील तारीख स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन सहकार्य करावे ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)**

## सु च ना

**दिनांक :- १९/०१/२०१०**

दिनांक १५/०१/२०१० रोजी पुढे ढकलण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शुक्रवार, दिनांक २२ जानेवारी २०१० रोजी दुपारी ३.३० वाजता** आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २२) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-२२)**

## सु च ना

**दिनांक :- २५/०१/२०१०**

दिनांक २२/०१/२०१० रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी २०१० रोजी दुपारी ३.०० वाजता** "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या सभेची विषय-पत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २२) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

टिप :- ही सभा **दुपारी ४.००** नंतरही चालू राहिल्यास
ही सभा संपल्यानंतर नियमित स्थायी समिती
सभा (का.प.क्रमांक २३) सुरू होईल.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद